सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## प्रधान मुख्य वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स) , महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय
## प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर

"वनभवन", रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१, दूसरा माळा, "सीविंग "
E-mail ID pccfbpd@mahaforest.gov.in
Phone No : ०७१२-२५५०६७५

**ज्ञापन**

विषय:- **अर्थसंकल्पीय अनुदान २०२५-२६.**
शासकीय कर्मचा-यांना २०२५-२६ या वित्तीय वर्षात घरबांधणी अग्रीम मंजूर करण्यासाठी निधी उपलब्धता प्रमाणपत्र देण्याबाबत.

क्रमांक:- कक्ष-२(१)/असं/प्र.क्र.२५/ ५९२ /२०२५-२६
नागपूर-४४० ००१, दिनांक:- 06 /०३ /२०२६

संदर्भ:- १. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दि. ०१/०३/२०२४
२. शासन ज्ञापन क्र. घबांप्र-२०२५/E-१३३४११५/प्र.क्र. ३७/अर्थसंकल्प , दिनांक २८/०२/२०२६

संदर्भिय शासन ज्ञापन क्रमांक २ अन्वये प्रधान शिर्ष ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्ज (योजनेत्तर) उपशिर्ष २०१- घर बांधणी अग्रिमे (००) (०१) घर बांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या लेखाशीर्षा खाली सन २०२५-२६ या वित्तीय वर्षा करिता एकुण रु.११९,७८,१७,८९२/- (रुपये एकशे एकोणवीस कोटी अठ्याहत्तर लक्ष सतरा हजार आठशे ब्याण्णव फक्त) एवढे अनुदान चिन्हांकित करण्यात आले आहे.

**२.००** संदर्भाधिन शासन ज्ञापन क्रमांक २ अन्वये मागणी क्रमांक सी-१२ प्रधान शिर्ष ७६१०-शासकिय कर्मचारी इत्यादींना कर्जे, २०१ (००) (०१) घर बांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या शिर्षाखाली रु. ३०,००,००,०००/- (अक्षरी तीस कोटी रुपये फक्त) एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदरील अनुदानातुन उपरोक्त संदर्भिय शासन पत्र क्रमांक २ अन्वये मंजुर यादी मध्ये नांवे असलेल्या अधिका-यास / कर्मचा-यास खालील तपशिलानुसार घरबांधणी अग्रिम वाटप करण्यासाठी यासोबत जोडलेल्या **विवरणपत्र "अ"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक अनुदान संबंधित नियंत्रक अधिकारी यांचे सुपूर्द करण्यात येत आहे. तसेच सदर अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BDS) वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ज्यांना अग्रिम मंजूर करण्यात येत आहे, त्यांची नावे **विवरणपत्र "ब"** मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्याचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.तसेच या मध्ये यापूर्वी व आता मंजूर केलेल्या घरबांधणी अग्रीमातील पहिला/दुसरा व तिसरा टप्यांच्या समावेश करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | शासन मंजूर प्रतिक्षा यादी प्रमाणे वाटपासाठी (विवरणपत्र "ब" अ.क्र. १ ते १७३) | ३०,००,००,०००/- |
| | **एकूण** | **३०,००,००,०००/-** |

**३.००** शासनाने संदर्भाधिन ज्ञापन क्रमांक २ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीचा विचार करुन **विवरणपत्र "ब"** मधील पात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रतिक्षा यादीतील जेष्ठतेनुसार घरबांधणी अग्रिम मंजूर करावयाचा आहे. ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची नांवे या प्रतिक्षा यादीत नाही, त्यांना या अनुदानातून अग्रिम वाटप करता येणार नाही. तसेच प्रतिक्षा यादीतील जेष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांना वगळून इतर कनिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांना कोणत्याही

परिस्थितीत अग्रिम मंजूर केला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच सदर यादीतील शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने सोबत सहपत्रित केलेल्या प्रतिक्षायादीतील अधिकारी/ कर्मचारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. उर्वरित अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रकरणी पुढील आर्थिक वर्षात शासनाकडून अग्रीम उपलब्ध झालेस जेष्ठता नूसारच वाटप करण्यात येईल. तरी याबाबत उर्वरित अधिकारी / कर्मचारी यांनी दक्षता घ्यावी व अनावश्यक पत्रव्यवहार टाळावा.

**४.०० संदर्भिय शासन निर्णय दिनांक ०१/०३/२०२४ मध्ये नमुद खालील अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

१. ज्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करावयाचे आहे, अशा कर्मचारी / अधिकाऱ्यांची शासनाच्या सेवेतील नियुक्ती संबंधित पदांच्या सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेली असली पाहिजे आणि अशाप्रकारे करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीत कमी ५ वर्षाची सेवा झाली असली पाहिजे. त्याचप्रमाणे अग्रिम मंजूर करतेवेळी शासन अधिकारी / कर्मचारी यांचा उर्वरीत सेवा कालावधी किमान **५ वर्षे शिल्लक** असणे अनिवार्य आहे.

२. वरील सर्व प्रयोजनार्थ संपूर्ण शासकीय सेवेमध्ये ***फक्त एकदाच अग्रिम अनुज्ञेय होईल.*** मात्र, शासनाकडून अग्रिम घेऊन बांधलेल्या / खरेदी केलेल्या घराचा **नैसर्गिक आपत्तीतून उद्भवलेल्या** दुरूस्तीकरिता पहिल्यांदा मंजूर झालेले अग्रीम व या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय होणारे घरबांधणी अग्रीम यामधील फकराएवढी रक्कम घरबांधणी अग्रीम म्हणून दुस-यांदा अनुज्ञेय करता येईल. सदर अग्रीमाची रक्कम उपरोल्लेखित फरकाइतकी **किंवा** घर दुरुस्तीचा खर्च **किंवा रु. ३०** लक्ष यापैकी जी कमी असेल ती रक्कम घर दुरुस्तीकरीता या प्रयोजनाखाली अग्रीम म्हणून अनुज्ञेय राहील.

३. घरबांधणी नियम प्रयोजनातील कोणत्याही प्रयोजनासाठी अग्रिम घेण्याकरिता **नोंदणीकृत गहाणखत** आवश्यक राहील. वैयक्तिक बंधपत्र / जामीनखत इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता राहील.

४. घराच्या किंमतीइतका घराचा विमा, शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रिम धारकाने दक्षता घ्यावी.

५. पती, पत्नी दोघेही शासकीय कर्मचारी असले तरीही त्यापैकी एकालाच (विहीत मर्यादेत) घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय राहील.

६. वरील सर्व प्रयोजनार्थ घेण्यात येणाऱ्या अग्रीमाकरिता घर / जमिन अर्जदाराच्या स्वत:च्या नावावर असणे आवश्यक राहील व ते भारतात कोठेही असले तरी अग्रिम अनुज्ञेय होईल.

७. दिनांक १ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या अर्जदारास (दुसऱ्या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या अग्रिमाचा लाभ घेता येणार नाही.

८. अग्रिम मंजूरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसूली पूर्ण झाल्यानंतर या दोन्ही बाबींची नोंद सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

९. **शासकीय अधिकारी/कर्मचारी, यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करताना, त्यांच्या शिल्लक घरबांधणी अग्रिम मुद्दल व व्याजाची वसूली, त्या अधिकारी/कर्मचारी याच्या सेवा निवृत्ती उपदान अथवा परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून वसूल करण्यासंदर्भात संमती पत्र देणे आवश्यक असेल. सदर संमतीपत्र घेण्याची जबाबदारी अग्रिम मंजूर करणा-या अधिका-याची राहील.**

१०. शासन सेवेत असताना अग्रिम धारकाचा मृत्यु झाल्यास, त्याच्या मृत्युच्या दिनांकास शिल्लक असलेल्या व्याजाच्या रकमेची वसुली प्रशासकीय विभागाने सोडून दयावी. मृत्युच्या दिनांकाला शिल्लक असलेल्या मुद्दलाची पूर्ण रक्कम त्यांच्या मुत्यु-नि-सेवा उपदान/परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. त्यापेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहिल्यास रु. १.०० लक्ष पर्यंतचीच रक्कम क्षमापित करता येईल व ती रक्कम क्षमापित करण्यास संबंधित प्रशासकीय विभाग सक्षम राहील. त्यानंतरही शासकीय कर्मचा-याकडून घरबांधणी अग्रिम रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचा-

याच्या वारसदाकडून अथवा वारसदारास अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्त केल्यास त्याच्याकडून शिल्लक रकमेची वसूली करावी. अन्यथा अशा कर्मचा-याचे घर/सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिका-याने सदर घर/सदनिका लिलाव करून त्या रकमेतून वसूली करावी.

११. घरबांधणी अग्रिमधारकास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९, मधील नियम क्रमांक ८ नुसार शासन सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केल्यास/बडतर्फ केल्यास अथवा सेवेतून काढून टाकले असल्यास सक्तीने सेवानिवृत्तीच्या/बडतर्फीच्या/सेवेतून काढून टाकल्याच्या दिनांकास त्यास देय असलेल्या शासकीय रकमांमधून, वसूल करावयाची शिल्लक घरबांधणी अग्रिमाची संपूर्ण रक्कम व शिल्लक व्याजाची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात यावी. यानंतरही शासकीय कर्मचा-याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजांची रक्कम वसूल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचा-याने शिल्लक रक्कम शासनास त्वरीत एकरकमी भरणा करावी अन्यथा अशा कर्मचा-याचे घर/सदनिका शासनाकडे गहाण असल्याने सक्षम प्राधिका-याने सदर घर/सदनिका लिलाव करून त्या रकमेतून वसूली करावी.

१२. घरबांधणी अग्रिम रकमेच्या नियमित व योग्य वसुलीसाठी अर्जदार स्वतः जबाबदार राहील.

१३. अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला, अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रिम तसेच शासनाकडील इतर अन्य अग्रिमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहील. याबाबत अग्रिम मंजूरीच्या आदेशात स्पष्ट उल्लेख करण्याची जबाबदारी अग्रिम मंजूरी प्राधिका-याची राहील.

१४. शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे त्या कारणाकरिता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम, प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात यावी.

१५. संबंधित प्रशासकीय विभागाने निधी उपलब्धतेचे प्रमाणपत्र दिलेले असले पाहिजे.

१६. शासकीय कर्मचा-यास मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाच्या प्रथम हप्त्याची रक्कम वितरीत केल्यानंतर संबंधित कर्मचा-याने कोणत्याही कारणास्तव पुढील अग्रिम न घेता प्रथम हप्त्यात घेतलेल्या अग्रिमाची रक्कम परत करून अग्रिम रद्द केल्यास अग्रिम मंजूरीच्या दिनांकास प्रचलित असलेल्या व्याजदराने गणना करून रक्कम परतीच्या दिनांकापर्यंतच्या व्याजाची वसूली करण्यात यावी. तसेच, सदर अधिकारी/कर्मचारी यांना पुन्हा घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येऊ नये.

१७. प्रतिनियुक्तीवरील कर्मचा-यांना अग्रिम मंजूरी संदर्भात वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक एफएनआर १०७०/२०७६/एफ-१, दिनांक ०९ मे, १९७२ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

**५.००** सोबतच्या यादीमधील ज्या अधिकारी / कर्मचा-यांची नांवे शासनाकडून पूर्वी पाठविण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये असल्यास या यादीमधील त्यांची नांवे रद्द समजण्यात यावी. तसेच पूर्वीच्या प्रतिक्षा यादीनुसार ज्या अधिकारी / कर्मचा-यांना अग्रिम देण्यात आला असेल, तर ***त्यांना पुन्हा अग्रिम मंजूर करण्यात येऊ नये.***

**६.०० कृपया सोबत पाठविलेल्या यादीमध्ये कर्मचाऱ्यांच्या नावामध्ये अगर पदनामामध्ये दुरुस्ती असेल तर आपल्या पातळीवर आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.**

**७.००** ज्या प्रयोजनाकरिता अग्रिम मंजूर करावयाचा आहे, त्या प्रयोजनाकरिता सुधारीत शासन निर्णयांन्वये विहीत अटी व कमाल मर्यादा विचारात घेऊन अनुज्ञेय तेवढाच अग्रिम मंजूर करावा.

**८.००** घरबांधणी अग्रीम मंजूर झालेल्या अधिकाऱ्यांची /कर्मचायांची आंतरवृत्तीय किंवा बदली झाल्यास त्यांच्या परतफेडीच्या हप्त्यांची किती रक्कम वसूल होणे बाकी आहे, इत्यादी बाबतची माहिती ज्या कार्यालयात बदली झाली आहे त्या कार्यालयास आवश्यक असल्यास, ती देण्यासंदर्भात संबंधित नियंत्रक अधिकारी (अग्रीम मंजूर करणारा प्राधिकारी) जबाबदार

राहतील. तसेच अग्रिम देतांना संबंधिताकडून आवश्यक ती कागदपत्रे विहित कालावधीत घेण्याची दक्षता संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

**९.००** एखाद्या अधिकाऱ्याने अग्रिमाची संपुर्ण फेड केली असेल व त्याला आवश्यक असल्यास, त्याबाबतचे "**ना देय प्रमाणपत्र**" देण्याबाबतची कार्यवाही आपल्या कार्यालयाने करावी.

**१०.००** सुपुर्द करण्यात आलेल्या अनुदानाच्या अधिन राहुन सोबतचे यादीतील अधिकारी / कर्मचाऱ्याची अग्रिम वाटपास पात्र नांवे व अनुज्ञेय अग्रिमाची निश्चिती उपरोक्त विहीत अटी व शर्तीचे अधिन राहुन करण्याची तसेच अग्रिम वितरीत करण्याची जबाबदारी संबंधित नियंत्रक अधिकारी यांची राहील. हयात कोणतीही अनियमितता झाल्यामुळे मा. लोक आयुक्त / मा. न्यायालय यांचेकडे तक्रारी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नियंत्रक अधिकारी म्हणून आपली राहील, याची नोंद घ्यावी.

**११.००** प्रादेशिक वनवृत्तात मुख्य लेखापाल व वनक्षेत्रपालांपर्यंतचे संवर्गाची आस्थापना ठेवण्यात येत असल्याने त्या सर्व संवर्गातील अधिकारी / कर्मचारी कोठे कार्यरत आहेत, त्याची संपूर्ण माहिती प्रादेशिक वनवृत्तात असते, यास्तव सोबतचे प्रतिक्षा यादीपैकी, सध्या कार्यात्मक विभागात, कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना वगळून वनवृत्ताच्या आस्थापनेत असलेल्या इतर सर्व अधिकारी / कर्मचारी यांना (सामाजिक वनीकरण, वनविकास महामंडळ तथा अन्य प्राधिकरणाकडे प्रति नियुक्तीवर / कार्यरत असलेल्यांसमवेत) घर बांधणी अग्रिम वाटप करण्याची जबाबदारी संबंधित प्रादेशिक वनवृत्त कार्यालयाची राहील. अशा प्रकरणी संबंधित प्रादेशिक वनवृत्ताने अग्रिम मंजूरीचे आदेश काढून अग्रिमाचे वाटप संबंधित कर्मचाऱ्यांना करावे व आदेशाची प्रत संबंधित कार्यालयास पाठवून सेवा पुस्तकात आवश्यक नोंदी घेणे व अग्रिमाची वसूली नियमितपणे करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच आवश्यक दस्तावेज प्राप्त करण्याची कार्यवाही करावी.

**१२.००** सोबतचे यादीतील काही अधिकारी / कर्मचारी अन्य वनवृत्तात बदलून गेले असल्यास त्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे अग्रिमाची रक्कम विहीत आदेश जारी करुन वितरित करण्यासाठी ***परस्पर संबंधित प्रादेशिक वनवृत्ताकडे वळती करावी*** तसेच त्याच प्रादेशिक वनवृत्ता अंतर्गत अन्य कार्यात्मक वनवृत्तात (कार्य योजना, वन्यजीव, मूल्यांकन इ.) कर्मचारी बदलून गेले असल्यास त्यांचे अग्रिमाची रक्कम संबंधित कार्यात्मक वनवृत्ताचे प्रमुखाकडे वळति करावी व त्याची सविस्तर माहिती लगेच ई-मेलव्दारे या कार्यालयास सादर करावी.

**१३.००** सोबतचे प्रतिक्षा यादीतील एखादा अधिकारी / कर्मचारी मूळ अर्ज सादर करतेवेळी आपले वनवृत्तात / अधिनस्थ कार्यालयात कार्यरत नव्हता तथापि आजघडीस तो आपले वनवृत्तात / अधिनस्थ कोणत्याही कार्यालयात कार्यरत असल्यास, त्याला अग्रिम मंजूर करण्याची जबाबदारी सध्या कार्यरत असलेल्या वनवृत्ताचे नियंत्रक अधिकारी म्हणून आपली राहील. तरी संबंधितास या पत्राद्वारे देण्यात आलेल्या सुचनांचे अधिन राहून घर बांधणी अग्रिम वाटप करण्यात यावे. तसेच अशा सर्व प्रकरणाची परिपूर्ण माहिती तात्काळ या कार्यालयास पाठविण्यात यावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत एकाच अधिकारी / कर्मचाऱ्यास त्याच्या एकूण शासकीय सेवेत एकापेक्षा जास्त वेळा घर बांधणी अग्रिम मंजूर किंवा वाटप होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**१४.००** शासकिय कर्मचाऱ्यांस घर बांधणी अग्रिम मंजुर करावयाचे आदेश महसुल व वनविभाग पत्र क्र.पी-७६१०-८२ फॉर्मस/ ब-१, दिनांक १२/०४/१९८२ ला जोडलेल्या प्रपत्रातील नमुना फॉर्म प्रमाणेच सक्षम अधिका-याने काढावेत.

**१५.००** ज्या शासकिय कर्मचाऱ्यांना हि अग्रिमे आपल्याकडून मंजूर करण्यात येतील त्यांच्याच नांवे ही अग्रिमे प्रत्यक्षात धनादेशाद्वारे वितरित झाली पाहिजेत.

**१६.००** अग्रिम मंजूर करतांना तसेच अग्रिम वितरित करतांना शासनाने नेमुन दिलेल्या सर्व अटीचे पालन करावे. जर काही अटींचे पालन न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित नियंत्रक अधिकाऱ्यांचे राहील.

**१७.००** या प्रकरणी काढलेल्या आदेशाची प्रत्येकी एक प्रत या कार्यालयास तसेच महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील कार्यासन ब-१, व महालेखापाल, मुंबई / नागपूर यांचेकडे न चुकता सादर करावी. आदेशांत मागणी क्रमांक, प्रधान / गौण / उप शीर्ष व संगणक संकेतांक या सर्व बाबी अंतर्भूत करण्यात याव्या.

**१८.००** या बाबत संबंधीत देयकाला जोडण्यांत येणाऱ्या "कॅम्प्युटर स्लीप" मध्ये (७६१० ०१४९) या संगणक संकेतांकाचा उपयोग न चुकता करण्यांत यावा. सदरचा खर्च मागणी क्रमांक सी-१२ प्रधान शिर्ष ७६१०-शासकिय कर्मचारी इत्यादींना कर्जे, २०१ (००) (०१) घर बांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा व सन २०२५-२६ या वर्षाच्या मंजूर अनुदानातून तो भागविण्यांत यावा. तसेच या अनुदानाच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचे गोषवारे विहित मुदतीत या कार्यालयास सादर करावे.

**१९.००** चालू वित्तीय वर्षात नियंत्रक अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यांत आलेल्या अनुदानाचे अनुषंगाने प्रत्यक्ष खर्ची घालण्यात आलेल्या रकमेचा महालेखापाल यांच्या हिशोबांशी मेळ बसवून महालेखापालाव्दारे प्रमाणीत ताळमेळ पत्रक तसेच विनियोजन लेखे विहीत मुदतीत सादर करावेत.

**२०.००** संदर्भाधिन ज्ञापन क्रमांक ३ अन्वये अग्रिमाचे अनुदान **दि. २०/०३/२०२६ पर्यंत** खर्च करावयाचे आहे, याची नोंद घ्यावी व त्यानुसार संबंधितांना अग्रिम सत्वर मंजुर करुन अग्रिमाचे वाटप करण्याकरिता संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांस पर्याप्त वेळ द्यावा. जेणेकरुन कोणत्याही कोषागाराकडून वेळे अभावी तो नाकारल्या जाणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

**२१.००** वर उल्लेखित सुचनांचे अनुषंगाने घर बांधणी अग्रिम मंजूर करतांना, तसेच त्याप्रमाणे अग्रिमाची रक्कम वितरीत करतांना सदर विषयावर निर्गमित विविध शासन निर्णय, वित्तिय नियम तसेच वर संदर्भित शासन ज्ञापन / पत्रान्वये तसेच वर उल्लेखित सुचनांचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे कोणतीही अनियमितता घडल्यास त्यासाठी संबंधित नियंत्रक अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी तसेच त्या - त्या कार्यालयातील संबंधित लिपीक / लेखापाल यांचे सोबत त्या शाखेतील मुख्य लेखापाल व कार्यालय अधिक्षक हे सर्व जबाबदार धरले जातील व शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**२२.००** या आदेशाचे तंतोतंत पालन करावे. सदर आदेशाचे पालन न केल्याने अनुदान व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नियंत्रक अधिकाऱ्याची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**२३.००** सोबत जोडलेली यादी हि शासनाने मंजूर केलेली आहे. तथापी, वनवृत्ताकडून प्राप्त झालेल्या माहितीनूसार मृत पावलेले, सेवानिवृत्त, अग्रीम घेण्यास नकार, वनविभाग सोडून इतर विभागात गेलेले, यापूर्वी अग्रीम मिळालेले, दुबार नाव आलेले असे अधिकारी/ कर्मचारी यांना वगळण्यात आलेले असून त्याव्यतिरिक्त इतर कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

**२४.००** सोबत जोडलेली यादी हि शासनाने मंजूर केलेली आहे. तथापी, वनवृत्ताकडून प्राप्त झालेल्या माहितीनूसार मृत पावलेले, सेवानिवृत्त, अग्रीम घेण्यास नकार, वनविभाग सोडून इतर विभागात गेलेले, यापूर्वी अग्रीम मिळालेले, दुबार नाव आलेले असे अधिकारी/ कर्मचारी यांना वगळण्यात आलेले असून त्याव्यतिरिक्त इतर कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

**२५.००** सोबत जोडलेल्या यादीतील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी अग्रीम घेण्यास नकार दिल्यास त्याबाबत या कार्यालयास **दि. १५/०३/२०२६ पूर्वीच कळविण्यात यावे व रक्कम समर्पित करण्याची दक्षता घ्यावी.**

**२६.००** रक्कम खर्ची घातलेनंतर त्याबाबतचा धनादेश क्रमांक व रक्कम, प्रमाणक क्रमांक / दिनांक याचा तपशील या कार्यालयास खालील प्रपत्रात दिनांक तातडीने पाठवावे.

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | कार्यालयाचे नांव व घर बांधणी अग्रिम मंजूरीचे आदेश क्रमांक | वितरित अग्रिमाची रक्कम (रुपये) | अग्रिम घेण्याचे प्रयोजन (तयार घर/घर बांधणी / दुरस्ती इ.) | धनादेश क्रमांक व दिनांक | प्रमाणपत्र क्रमांक/ महिना | विहीत सुचनाप्रमाणे द्यावयाचे सर्व दस्तावेज प्राप्त करणेची पुर्तता झाल्याबाबत अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

सहपत्र :- १) विवरणपत्र "अ"
२) विवरणपत्र "ब"

**(एम श्रीनिवास राव)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**(अर्थसंकल्प, नियोजन व विकास),**
**महाराष्ट्र राज्य**

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) म.रा. पुणे

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), म.रा. चंद्रपूर

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पूर्व- नागपूर/ मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पश्चिम-मुंबई

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) अमरावती / कोल्हापूर / गडचिरोली / चंद्रपूर/नागपूर /ठाणे

वनसंरक्षक (प्रा.) छत्रपती संभाजीनगर/ धुळे

प्रतिलिपी :- अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सर्दभिय शासन निर्णय, पत्र व ज्ञापनाचे अनुषंगाने माहिती करिता सादर.

प्रतिलिपी :- महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), म.रा., नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता सादर.

प्रतिलिपी वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित

प्रतिलिपी :- कक्ष अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सर्दभिय शासन निर्णय, पत्र व ज्ञापनाचे अनुषंगाने माहिती करिता अग्रेषित.

प्रतिलिपी :- सहपत्रासह या कार्यासनातील कक्ष-२(४) विनियोजन शाखा,अ. प्र.मु.व.सं.(अ.नि.व वि.) म.रा. नागपूर यांचे कार्यालय यांना माहितीकरिता.

DOCUMENT1

# विवरणपत्र ''अ''

**मागणी क्रमांक सी- १२ प्रधानशिर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्ज,२०१ (००)(०१) घरबांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या लेखा शिर्षाखाली अनुदानाची नियंत्रण अधिकारी निहाय वाटणी या कार्यालयाचे ज्ञापनक्रमांक कक्ष-२(१)/असं/२५/५९२/२०२५-२६, दिनांक ०७/०३/२०२६**

| अ.क्र. | नियंत्रक अधिका-यांचे नांव | सुपूर्द करण्यांत आलेली मंजूर अग्रिमाची रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनिकरण) म.रा. पुणे | १,५०,००,००० |
| २. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (शिक्षण प्रशिक्षण) म रा. चंद्रपूर | ५५,२५,००० |
| ३ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर | ३,५१,४०,००० |
| ४ | मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई | १,५०,००,००० |
| ५. | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), अमरावती | १,७४,८७,५०० |
| ६ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर | २,२६,००,००० |
| ७ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली | २,६९,००,००० |
| ८ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे | १,०४,२३,००० |
| ९ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे | ९१,००,००० |
| १० | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपुर | ३,२६,४५,००० |
| ११ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे | २,५०,४९,००० |
| १२ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर | १३,५०,००० |
| १३ | वनसंरक्षक (प्रा.), छत्रपती संभाजीनगर | ८,३७,८०,५०० |
| | एकुण रक्कम रु. | ३०,००,००,००० |

(एम.श्रीनिवास राव)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
(अर्थसंकल्प, नियोजन व विकास)
महाराष्ट्र राज्य

DOCUMENT1

घरबांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या लेखा शिर्षाखाली नियंत्रण अधिकारी निहाय अनुदानाची वाटणी
या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक कक्ष-२(१)/असं/प्र.क्र. २५/४९२/२०२५-२६, दिनांक०६/०३/२०२६

## विवरण पत्र "ब"

| अ.क्र. | वनवृत्ताचे नांव | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पदनाम | मुळ वेतन (७व्या वेतन आयोगा प्रमाणे) | घरबांधणी अग्रिमाचे प्रयोजन | मागणी केलेली रक्कम (रु.) | वाटप करावयाची रक्कम रु. | देय रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | १ ला हप्ता रक्कम रु. ३० % | २ रा हप्ता रक्कम रु. ४० % | ३ रा हप्ता रक्कम रु. ३०% |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | मु.व.सं. (प्रा.), चंद्रपूर | श्री. एस. एम. लोणारे | वनपाल | ५४६०० | घर बांधण्यासाठी | २०००००० | ६००००० | ६००००० | ८००००० | ६००००० |
| २ | मु.व.सं. (प्रा.), चंद्रपूर | श्री. एस.बी.पडवे | वनक्षेत्रपाल | ४१८०० | घर बांधण्यासाठी | २५००००० | ७५०००० | ७५०००० | १०००००० | ७५०००० |
| ३ | अ.प्र.मु.व.सं.(सं.शि.व प्र.)म.रा. चंद्रपूर | श्री. आर.एस. राठोड | वनमजूर | २१८०० | घर बांधण्यासाठी | ७५०००० | २२५००० | २२५००० | ३००००० | २२५००० |
| ४ | मु.व.सं. (प्रा.), गडचिरोली | श्री जे. एस. मल्लीया | वनरक्षक | ३४४०० | घर बांधण्यासाठी | १०००००० | ३००००० | ३००००० | ४००००० | ३००००० |
| ५ | मु.व.सं. (प्रा.), ठाणे | श्री. संजय लक्ष्मण हमरे | वनपाल | ५४६०० | घर बांधण्यासाठी | २५००००० | १५७०००० | ६००००० | १५७०००० | ० |
| ६ | अ.प्र.मु.व.सं.(सं.शि.व प्र.)म.रा. चंद्रपूर | श्री. एस.बी.राठोड | वनमजूर | २१८०० | घर बांधण्यासाठी | ७५०००० | ३००००० | २२५००० | ३००००० | ० |
| ७ | मु.व.सं. (प्रा.), गडचिरोली | श्री.एस. आर. दिघोरे | वनरक्षक | २९३०० | तयार घर खरेदी | २९००००० | २९००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ८ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री ए. एम. शेळके | वाहन स्वच्छक | २४५०० | तयार घर खरेदी | २४५००० | २४५००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ९ | मु.व.सं. (प्रा.), गडचिरोली | श्री. बी. आर. भुरकुडे | वनरक्षक | २९३०० | तयार घर खरेदी | ३०००००० | ३०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १० | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री ए. आर. वाणी | वनमजूर | २३२०० | घर बांधण्यासाठी | २०००००० | ६००००० | ६००००० | ० | ० |
| ११ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री. पी. के. गौतम | लेखापाल | ४१४०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १२ | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री कृष्णा हरी चौगले | वनमजूर | २३२०० | तयार घर खरेदी | ६००००० | ६००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १३ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री व्ही. एस. मरसकोल्हे | चौकीदार | १०७२० | तयार घर खरेदी | १२००००० | १२००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १४ | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री. गंगाराम कोंडीबा कोकरे | वनमजूर | २३२०० | तयार घर खरेदी | ६००००० | ६००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १५ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री एस. बी. राऊत | वनमजूर | २३२०० | तयार घर खरेदी | १०००००० | १०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १६ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | कु. एस. यु. साखरे | वनरक्षक | ३०६०० | तयार घर खरेदी | २०००००० | २०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १७ | व.सं. तथा क्षे.सं. मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती | कु. आर. एस. पवार | वनरक्षक | ३०६०० | तयार घर खरेदी | ३०६०००० | ३०६०००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प नियोजन व विकास)
म.रा., नागपूर

घरबांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या लेखा शिर्षाखाली नियंत्रण अधिकारी निहाय अनुदानाची वाटणी
या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक कक्ष-२(१)/अस/प्र.क्र. २५/४९९/२०२५-२६, दिनांक ०६/०३/२०२६

## विवरण पत्र "ब"

| अ.क्र. | वनवृत्ताचे नांव | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पदनाम | मुळ वेतन (७व्या वेतन आयोगा प्रमाणे) | घरबांधणी अग्रिमाचे प्रयोजन | मागणी केलेली रक्कम (रु.) | वाटप करावयाची रक्कम रु. | देय रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | १ ला हप्ता रक्कम रु. ३० % | २ रा हप्ता रक्कम रु. ४० % | ३ रा हप्ता रक्कम रु. ३०% |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १८ | व.सं. तथा क्षे.सं. मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती | श्री एस. एफ. बिलवे | वनमजूर | २३२०० | तयार घर खरेदी | २३२०००० | २३२०००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| १९ | व.सं. तथा क्षे.सं. मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती | श्री. पी. एन. घोडेस्वर | वनमजूर | २३२०० | तयार घर खरेदी | २३२०००० | २३२०००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| २० | मु.व.सं. (प्रा.), गडचिरोली | श्री डी. जी.लेकामी | वनरक्षक | ३५४०० | घर बांधण्यासाठी | ३०००००० | ९००००० | ९००००० | ० | ० |
| २१ | मु.व.सं. (प्रा.), गडचिरोली | श्री डी. जे. मुलनकर | वनमजूर | २३२०० | तयार घर खरेदी | १५००००० | १५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| २२ | मु.व.सं. (प्रा.), धुळे | श्रीमती ज्योती प्रकाश पानपाटील | वनरक्षक | ३४३०० | तयार घर खरेदी | १५३०००० | १५३०००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| २३ | मु.व.सं. (प्रा.), धुळे | श्रीमती सविता बाबुराव वाघ | वनरक्षक | २९७०० | गृहकर्ज परतफेड | १५३०००० | १५३०००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| २४ | मु.व.सं. (प्रा.), धुळे | श्री. विंदल काशिनाथ इंगळे | वनरक्षक | २९७०० | तयार घर खरेदी | १५००००० | १५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| २५ | मु.व.सं. (प्रा.), धुळे | श्रीमती अलका संजय पाटील | वनरक्षक | २९३०० | तयार घर खरेदी | १५८०००० | १५८०००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| २६ | मु.व.सं. (प्रा.), धुळे | श्री. हिरालाल मंगा माळी | वनरक्षक | ३२४०० | घर बांधण्यासाठी | १५३०००० | ४५९००० | ४५९००० | ० | ० |
| २७ | मु.व.सं. (प्रा.), धुळे | श्री शांतिनाथ दत्तु बनगे | वनरक्षक | २९७०० | घर बांधण्यासाठी | १०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| २८ | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री उत्तम महादू पांढरे | वनरक्षक | ३०६०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| २९ | मु.व.सं. (प्रा.), गडचिरोली | श्री डी. एच. पोरतेट | वनरक्षक | ३५४०० | तयार घर खरेदी | ३८००००० | ३८००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३० | अ.प्र.मु.व.सं (वंजी) पश्चिम, मुंबई | श्री विशाल वसंत खेडकर | वनरक्षक | ३५४०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३१ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री आर. आर. सरदार | वनरक्षक | २९७०० | तयार घर खरेदी | २९००००० | २९००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३२ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री एल. आर. बन्नगरे | वनमजूर | २२५०० | घर बांधण्यासाठी | १०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| ३३ | अ.प्र.मु.व.सं (वंजी) पूर्व, नागपूर | श्री सी. व्ही. कोम्पले | वनरक्षक | २९३०० | तयार घर खरेदी | ३०००००० | ३०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३४ | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री बिरु सिद्रास जावीर | वनरक्षक | ३०६०० | तयार घर खरेदी | ३०००००० | ३०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प नियोजन व विकास)
म.रा., नागपूर

घरबांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या लेखा शिर्षाखाली नियंत्रण अधिकारी निहाय अनुदानाची वाटणी
या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक कक्ष-२(१)/असं/प्र.क्र. २५/४६१ /२०२५-२६, दिनांक०६/०३/२०२६

## विवरण पत्र "ब"

| अ.क्र. | वनवृत्ताचे नांव | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पदनाम | मुळ वेतन (७व्या वेतन आयोगा प्रमाणे) | घरबांधणी अग्रिमाचे प्रयोजन | मागणी केलेली रक्कम (रु.) | वाटप करावयाची रक्कम रु. | देय रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | १ ला हप्ता रक्कम रु. ३० % | २ रा हप्ता रककम रु. ४० % | ३ रा हप्ता रक्कम रु. ३०% |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ३५ | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री दादा मारुती जानगर | वनरक्षक | ३०६०० | तयार घर खरेदी | ३०००००० | ३०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३६ | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री अविनाश आनंदा कांबळे | लेखापाल | ३७००० | तयार घर खरेदी | २२००००० | २२००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३७ | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री अमर उल्हासराव खरात | वाहनचालक | २३१०० | तयार घर खरेदी | २०००००० | २०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३८ | अ.प्र.मु.व.सं (वंजी) पश्चिम, मुंबई | श्री बुधा आनंदा भगत | वनरक्षक | ३५४०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ३९ | अ.प्र.मु.व.सं (वंजी) पश्चिम, मुंबई | श्री रंगनाथ संभाजी जायभाये | वनरक्षक | ३५४०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४० | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री निलेश शंकर पाथरवट | पहारेकरी | २३२०० | तयार घर खरेदी | २०००००० | २०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४१ | व.सं. (प्रा.), छत्रपती संभाजी नगर | श्री रावसाहेब ठाणसिंग राठोड | वनरक्षक | २९७०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४२ | व.सं. (प्रा.), छत्रपती संभाजी नगर | श्री प्रकाश दिनकर सुर्यवंशी | वनरक्षक | २८४०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४३ | मु.व.सं. (प्रा.), अमरावती | श्री निलेश चांगदेव राजपुत | लिपीक | ३१९०० | तयार घर खरेदी | ३९८७५०० | ३९८७५०० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४४ | अ.प्र.मु.व.सं (वंजी) पश्चिम, मुंबई | श्री शाम गुलाब बेलदार | वनरक्षक | ३०६०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४५ | व.सं. (प्रा.), छत्रपती संभाजी नगर | श्री आनंद भिमराव गायके | वनक्षेत्रपाल | ५६२०० | तयार घर खरेदी | ३४८०००० | ३४८०००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४६ | व.सं. (प्रा.), छत्रपती संभाजी नगर | श्री अनिल कृष्णराव पाटील | वनरक्षक | ३२४०० | तयार घर खरेदी | २०००००० | २०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४७ | व.सं. (प्रा.), छत्रपती संभाजी नगर | श्री शेख बाबु शेख गुलाब | वनरक्षक | ३२४०० | तयार घर खरेदी | २०००००० | २०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४८ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री ए. एम. चौधरी | वनमजूर | २३२०० | तयार घर खरेदी | २०००००० | २०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ४९ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री आय.एल. सोनकुसरे | वनरक्षक | ३३४०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ५० | मु.व.सं. (प्रा.), कोल्हापूर | श्री गणपती महादेव पाटील | वनरक्षक | ३४४०० | तयार घर खरेदी | १५००००० | १५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ५१ | मु.व.सं. (प्रा.), गडचिरोली | श्री के. ए. वैरागडे | वनरक्षक | २९३०० | तयार घर खरेदी | ३०००००० | ३०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प नियोजन व विकास)
म.रा., नागपूर

घरबांधणी अग्रिमे (७६१० ०१४९) या लेखा शिर्षाखाली नियंत्रण अधिकारी निहाय अनुदानाची वाटणी
या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक कक्ष-२(१)/अस/प्र.क्र. २५/५९२/२०२५-२६, दिनांक०६/०३/२०२६

## विवरण पत्र "ब"

| अ.क्र. | वनवृत्ताचे नांव | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पदनाम | मुळ वेतन (७व्या वेतन आयोगा प्रमाणे) | घरबांधणी अग्रिमाचे प्रयोजन | मागणी केलेली रक्कम (रु.) | वाटप करावयाची रक्कम रु. | देय रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | १ ला हप्ता रक्कम रु. ३० % | २ रा हप्ता रककम रु. ४० % | ३ रा हप्ता रक्कम रु. ३०% |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ५२ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री आर. एम. कन्सरे | वनमजूर | २२९०० | तयार घर खरेदी | ६००००० | ६००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ५३ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री पी. पी. कळसाईत | वनमजूर | २२५०० | तयार घर खरेदी | १०००००० | १०००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ५४ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री यु. बी. काळसर्पे | वनरक्षक | २९३०० | तयार घर खरेदी | १५००००० | १५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
| ५५ | मु.व.सं. (प्रा.), नागपूर | श्री पी. एम. केळवतकर | वनरक्षक | ४५७०० | तयार घर खरेदी | २५००००० | २५००००० | लागु नाही | लागु नाही | लागु नाही |
